بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्या प्रकाशमान उपदेशांद्वारे जलसा सालानामध्ये सहभागींना प्रवचन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरूर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. १-९-२०२३ स्थान जलसागाह Messe Stuttgart जर्मनी

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔ بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा नंतर हुजूर अनवर म्हणालेः अल्लाहच्या कृपेने आज जमाअत अहमदिया जर्मनीचा वार्षिक सम्मेलन मोठ्या प्रमाणावर होत आहे. अल्लाह सम्मेलनातील सर्व सहभागींना याचे उद्दिष्टे साध्य करण्याचे सामर्थ्य प्रदान करो. वार्षिक सम्मेलन आयोजित करण्याचा एक मोठा उद्देश जो हजरत अपेक्षित मसीह यांनी नमूद केला तो आणि अत्यंत वेदनेने व्यक्त केला तो हा की जमाअत मध्ये सामील होणाऱ्यांनी धार्मिक ज्ञान घ्यावा आणि अध्यात्मिकतेमध्ये वृद्धी करावी. आणि परमेश्वराशी संबंध व प्रेमात वाढ करावे. आणि पवित्र पैगंबर (स.) यांचे खरे अज्ञाधारक व्हावे.

हुजूर अनवर म्हणाले: या वर्षी अहमदिया जमाअतची जर्मनीमध्ये स्थापना होऊन १०० वर्षे झाली आहेत. परंतु यावर आनंदीत होण्यासोबतच हेही पाहणे अत्यावश्यक आहे की आम्ही या शंभर वर्षात काय प्राप्त केले आहे. आम्ही आमच्या विश्वासांचे किती प्रमाणात संरक्षण केले? हा पवित्र बदल आपण स्वतःमध्ये आणि आपल्या मुलांमध्ये घडवण्याचा प्रयत्न केला असेल, तर ही खरी कृतज्ञता जे या निमित्ताने अदा केली जावी. यावेळी मी हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांचे काहीं उद्धृत प्रस्तूत करेन जे आम्हाला आमच्या उद्देशांची पूर्ती करण्याकडे मार्गदर्शन करतील.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात, ''हे समजू नका की दीक्षा घेऊन तुम्ही परमेश्वराला प्रसन्न केले आहे. हा तर केवळ बाह्य स्वरूप आहे. त्याचा गाभा त्याच्या अंतरभागात आहे. म्हणून ज्याने दीक्षा स्वीकारली आहे त्याने आत्मनिरीक्षण करून पाहावे की तो कोणत्या स्तरावर आरूढ आहे. काय तो आतापर्यंत केवळ बाहेरील कवच आहे की आतील गाभा.

धर्माला भौतिक जीवनावर प्राधान्य देणे काय आहे? याचे स्पष्टीकरण देताना, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: माझा असा अर्थ नाही की मुस्लिमांनी आळशी व्हावे. इस्लाम कोणालाही आळशी बनवत नाही. व्यापार आणि नोकऱ्यांमध्ये व्यस्त राह, परंतु परमेश्वरासाठी वेळ न काढणे हे मला पसंत नाही. नमाजच्या वेळी नमाज सोडू नका आणि प्रत्येक बाबतीत धर्माला प्राधान्य द्या. तुमचा ध्येय जग नसून धर्म असावा. (असे झाल्यास) मग जगाचे कार्य देखील धर्माचे होईल. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: प्रगतीचा एकच मार्ग आहे तो म्हणजे परमेश्वराला ओळखणे आणि त्याच्यावर सजीव श्रद्धा बाळगणे.

धर्माला सर्व बाबतीत प्राधान्य देण्याबाबत ते म्हणतात की, दोन प्रकारचे लोक आहेत, एक म्हणजे इस्लामचा स्वीकार करणारे आणि सांसारिक व्यापारात गुंतलेले. त्यांच्या डोक्यावर सैतान स्वार असतो. माझा असा अर्थ नाही की व्यापार निषिद्ध आहे, पैगंबर (स.) चे सोबती देखील व्यापार करायचे पण त्यांनी धर्माला जगावर प्रभुत्त्व दिले. जेव्हा त्यांनी इस्लामचा स्वीकार केला तेव्हा त्यांना इस्लामचे खरे ज्ञान मिळवले, ज्यामुळे त्यांचे अंतःकरण विश्वासाने भरले. यामुळेच ते कोणत्याही क्षेत्रात सैतानाच्या हल्ल्यापासून डगमगले नाही.

परत म्हणाले: मी त्यांच्यासाठी अधिक आशा बाळगतो जे आपले धार्मिक प्रगती आणि उत्साह कमी करत नाहीत. मला भीती वाटते की जे लोक हे उत्साह कमी करतात त्यांच्यावर सैतान सत्ता करेल, म्हणून या मार्गात आळशी होणे चूकीचे आहे.

**पुढे म्हणाले: पवित्र कुरआन जाळण्याची हिंमत गैर-मुस्लिमांमध्ये का झाली? कारण आम्ही पवित्र कुरआनच्या शिकवणीचे पालन करणे सोडून दिले आणि त्यामुळेच त्यांना धैर्य मिळाले.** ज्याला ज्ञानात प्रगती करायची आहे त्याने पवित्र कुरआन काळजीपूर्वक वाचावे. जिथे समजत नाही तिथे विचारावे. पवित्र कुरआन हा एक आध्यात्मिक महासागर आहे ज्याच्या तळाशी अनेक दुर्मिळ आणि अमूल्य रत्ने आहेत. त्यामुळे पवित्र कुरआन ध्यानाने वाचणारे किती आहेत आणि त्याचे पालन करण्याचा प्रयत्न करणारे किती आहेत हे तपासले पाहिजे.

पुढे म्हणाले: खऱ्या धर्माचे मूळ देवावरील श्रद्धा आहे आणि देवावरील विश्वासासाठी खरी धार्मिकता व सदाचरण आवश्यक आहे. परमेश्वराची भीती बाळगा. सदाचारीला परमेश्वर कधीही वाया घालवत नाही. तो त्याला स्वर्गातून मदत करतो. देवदूत त्याला मदत करण्यासाठी खाली उतरतात. याहून अधिक काय चमत्कार पाहण्याजोगे आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: ती प्रार्थना (नमाज) वाईट गोष्टी दूर करते ज्यामध्ये सत्याचा आत्मा असतो आणि कृपेचा प्रभाव असतो. नमाज नक्कीच वाईट गोष्टी दूर करते. नमाजचा गाभा आणि आत्मा ती प्रार्थना आहे ज्यामध्ये एक आनंद आणि सुख प्राप्त होतो.

म्हणून सर्वांनी हे आत्मनिरीक्षण करून पहावे की त्यांना नमाज मध्ये सुख प्राप्त होत आहे का? भौतिक साहित्यांवर आम्ही अवलंबून राहू शकत नाही. जर आम्ही नमाजची सुरक्षा करणारे असतील तरच आम्ही दीक्षेचा हक्क अदा करणारे बनतील अन्यथा आपली परिस्थिती दुर्दैवी आहे.

ज्ञान आणि सद्विवेकबुद्धीमध्ये प्रगती आणि (मुर्शीद) गुरू आणि (मुरीद)शिष्य यांच्यातील संबंधांबद्दल, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: गुरू आणि शिष्य यांच्यातील संबंध शिक्षक आणि विद्यार्थ्याच्या उदाहरणावरून समजले पाहिजे. विद्यार्थ्याला जसा शिक्षकाचा फायदा होतो तसाच शिष्याला त्याच्या गुरूकडून होतो. पण जर विद्यार्थ्याने आपल्या गुरूशी नातेसंबंध जपले पण त्याच्या शिक्षणात प्रगती होत नसेल तर त्याला फायदा होऊ शकत नाही. शिष्याच्या बाबतीत असेच घडते. त्यामुळे यासंदर्भात नाते निर्माण करून आपले ज्ञान व विवेक वाढवले पाहिजे. सत्याचा शोध घेणाऱ्याने कधीही एका टप्प्यावर थांबू नये, अन्यथा शापित सैतान त्याला मार्गभ्रष्ट करेल.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात: जर माझी दीक्षा घेतली आहे तर मला शासक आणि न्यायनिष्ठूर म्हणून स्वीकारा. खात्री बाळगा की मी जे बोलेन ते सर्वशक्तिमान अल्लाह आणि पवित्र पैगंबर (स.) यांच्या शिकवणीनुसार बोलेन, ते म्हणाले: ज्यांनी मला नाकारले आणि ज्यांनी माझ्यावर आक्षेप घेतला त्यांनी मला ओळखले नाही आणि जो मला स्वीकारतो मग आक्षेप घेतो किंवा संशय बाळगतो तो सर्वात मोठा दुर्दैवी आहे ज्याने मला पाहून देखील अंधळा झाला.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) त्यांच्या आगमनाचा उद्देश आणि हेतू बद्दल सांगतातः माझ्या येण्याचा मुख्य उद्देश आणि हेतू एकेश्वरवाद, नैतिकता आणि अध्यात्म पसरवणे आहे. तौहीद म्हणजे सर्वशक्तिमान ईश्वरावर विश्वास ठेवणे आणि त्याला आपला उद्देश आणि परम गुरू आणि सर्वोत्तम प्रीय मानणे आहे.

नैतिकतेचा अर्थ असा आहे की, जितकी क्षमता एका व्यक्तिमध्ये आहे त्यानुसार त्यांना खर्च करावे किंवा इतरांच्या सहाय्यतेस आणावे. असे होऊ नये की काहींसाठी कार्यरत व्हावे आणि इतरांसाठी बिल्कूल कार्य करू नये. अध्यात्म म्हणजे सर्वशक्तिमान देवाशी खरा नातेसंबंध जोडल्यामुळे उद्भवणारी चिन्हे आणि लक्षणे आहेत. त्यामुळे प्रत्येक अहमदीने आपल्या हृदयात तौहीदच्या महत्त्वाचा विचार करणे आवश्यक आहे की त्याच्या अंतःकरणात कितपत तौहिद तेवत आहे. त्याचप्रमाणे मशिदी बांधत असताना त्याला भरवण्याचीही फिकीर असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, उच्च नैतिकता प्रत्येक अहमदीने व्यक्त केली पाहिजे. ही उच्च नैतिकता आहे जी आपला संदेश पोहोचविण्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**सर्वशक्तिमान अल्लाहशी आपला नातेसंबंध प्रस्थापित झाला आहे का? आपल्या प्रार्थनांचे उच्च दर्जे स्थापित केले आहेत का? आपण प्रार्थनेच्या वेळेत सांसारिक कामे सोडून प्रार्थनेसाठी उपस्थित राहतो की फक्त मशिदी बांधण्यावर भर असतो? आपण नियमितपणे पवित्र कुरआन पठण करतो का? आपण कुरआनातील आदेश शोधण्याचा आणि त्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करतो का? आपल्या मुलांना धर्माशी जोडण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत का? आम्हाला फक्त आमच्या मुलांच्या सांसारिक शिक्षणाचीच चिंता आहे की त्यांच्या धर्माचीही काळजी आहे? आपल्या उच्च नैतिक संबंधांनी दयेच्या दृष्टीने आपल्याला दाखवलेली गुणवत्ता प्राप्त झाली आहे का? इतरांना उच्च नैतिकतेची उदाहरणे दाखवून आपण त्यांना इस्लामच्या सुंदर शिकवणीची जाणीव करून देत आहोत का? तर सर्वप्रथम आपण अल्लाहचे हक्क आणि त्याच्या निर्मितीच्या हक्कांचे प्रमाण कितपत गाठले आहे याचे मूल्यमापन करणे जरूरी आहे.**

आम्ही या दाव्याने उठलो आहे की जगाची मने जिंकायची आहे. आम्हाला सर्वशक्तिमान ईश्वराचे एकत्व जगाला पटवून द्यायचे आहे. अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चरणी हे जग उभे करायचे आहे. तेव्हा या संदर्भात आपण प्रत्येकाने आपले आकलन करून नव्या निर्धाराने नव्या शतकात प्रवेश केला पाहिजे की धर्माला ऐहिक जीवनावर प्राधान्य देऊ जेणे आम्ही आपले उद्देश साध्य करण्यात प्रयत्नरत राहू आणि आपल्या अपत्यांना आणि पुढील पिढ्यांना देखील आदेशित करावे आणि त्यांचे अशा प्रकारे संगोपन करावे की त्यांच्यात देखील परमेश्वरासाठी तडफ कायम राहावी आणि ती तडफ पिढ्यांपिढ्या प्रगतशील होत रहावी. अल्लाह आम्हां सर्वांना हे साध्य करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔